# आंबेडकरी चळवळीतील योद्धा :कर्मवीर दादासाहेब गायकवाड

**–प्रा .प्रकाश मारुती पवार,** उपप्राचार्य ,फर्ग्युसन महाविद्यालय ,पुणे

दादासाहेब गायकवाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळीची धुरा सांभाळणारे आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारकार्य पुढे नेणारे एक महत्त्वाचे नेते होते .डॉ.बाबासाहेब आंबेडकर वकिली व्यवसायाच्या निमित्ताने नाशिकला गेले असताना त्यांची दादासाहेब गायकवाड यांच्याशी भेट झाली. तेव्हापासून बाबासाहेबांच्या अंत्यविधीपर्यंत आणि त्यानंतर आयुष्याच्या अखेरपर्यंत दादासाहेब गायकवाड यांनी बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि कार्याचा वसा पुढे नेला. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांचा उत्तरवारसदार म्हणून दादासाहेब गायकवाडयांच्याकडे पाहिले जाते .दादासाहेब गायकवाड यांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह ,बहिष्कृत हितकारणी सभा, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, येवल्यातील ऐतिहासिक परिषद, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशनमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे .

**भाऊराव कृष्णराव गायकवाड** ऊर्फ **दादासाहेबगायकवाड** : (जन्म -१५ ऑक्टोबर १९०२, मृत्यू-२९ डिसेंबर १९७१) आणिबाबासाहेब आंबेडकर ह्यांचे संबंध हे शिष्य, अनुयायी याच्याही पलीकडचे होते आणि म्हणूनच २० नोव्हेंबर १९३७ रोजी दादासाहेब गायकवाड यांचा नाशिक जिल्हा युवक संघाच्या वतीने मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला ,त्यावेळी बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ,"मी माझे आत्मचरित्र कदाचित लिहिले तर त्यात सर्वाधिक भाग भाऊराव गायकवाड ह्याच्यावर असेल, त्याशिवाय ते परिपूर्ण होणार नाही."[1]आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांना 1920 ते 1956 ह्या काळात एकूण 450 पत्रे लिहिली.[2]

**डॉ .आंबेडकरांसोबत सत्याग्रहांत सहभाग** : सत्याग्रही दादासाहेब दादासाहेब गायकवाड यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत तीन मोठे सत्याग्रह केले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह आणि मुखेडचा सत्याग्रह .या तिन्ही सत्याग्रहांत त्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व लाभले .बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना सत्याग्रही म्हणून प्रशिक्षित केले. गायकवाडांनी बाबासाहेब आंबेडकरांना मोलाची साथ दिली .बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहिनांचा केलेला सत्याग्रह भारताच्या इतिहासातला सर्वांत मोठा आहे .या सत्याग्रहाला ऐतिहासिक महत्त्व तर आहेच ,पण राजकीय महत्त्वसुद्धा आहे .राजकीय महत्त्व दोन अर्थांनी आहे .एक म्हणजे दिग्विजय नेते बाबासाहेबांनंतर असा एक मोठा सत्याग्रह त्यांच्या उत्तराधिकार करणाऱ्या दादासाहेब गायकवाड यांनी केला , त्यामुळे त्याचं महत्त्व आहे .दुसरे म्हणजे आजपर्यंत असा समज होता की ,आंबेडकरवादी फक्त जातीय प्रश्नांकडे पाहतात .मात्र या सत्याग्रहाने त्यासमजास उत्तर मिळाले.

भारतातल्या परिवर्तनवादी चळवळींनी वर्ग आणि जात यांच्या समन्वयाचं राजकारण करायला पाहिजे , हे सूत्र घेऊन महाराष्ट्रात कॉम्रेड शरद पाटील ह्यांनी सत्यशोधक मार्क्सवादी पक्ष काढला ,तर डॉ .रावसाहेब कसबे यांनी हे सूत्र व्यापकपणे' मार्क्स आणि आंबेडकर 'या ग्रंथात मांडले;[3]पण याची खरी सुरुवात दादासाहेब गायकवाड यांनी1964 साली भूमिहीनांचा लढा उभा करून केली होती.त्याचा व्यापक परिणाम फक्त आंबेडकरी चळवळीत झाला नाही ,तर भारतीय राजकारणातही पाहायला मिळतो.

दादासाहेब गायकवाड यांच्या सत्याग्रहाचा आणखी एक पैलू दुर्लक्षित राहिल ,त्यावरही लक्ष वेधणे आवश्यक आहे .संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये दादासाहेब गायकवाड आणि त्यांच्या शेड्युल कास्ट फेडरेशन या पक्षाने खूप महत्वाची भूमिका पार पाडली ,परंतु त्यावर संशोधकांकडून अद्याप फारसा प्रकाश पडल्याचा दिसून येत नाही.

**रिपब्लिकन पक्ष आणि दादासाहेब** : दादासाहेब गायकवाड यांचे कार्य समजून घेताना त्यांनी उभ्या केलेल्या रिपब्लिकन पक्षाला महत्त्वाचे स्थान आहे. 5डिसेंबर 1956 रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी डॉ .राम मनोहर लोहिया, प्र.के .अत्रे, एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे यांना पत्र लिहून संभाव्य रिपब्लिकन पक्षाची मांडणी केली होती .तत्पूर्वी बाबासाहेब आंबेडकरांचा त्यांच्याशी पत्रव्यवहार होऊन लोकशाहीत खंबीर अशा विरोधी पक्षाची गरज आहे आणि त्यातूनच काँग्रेस पक्षाला पर्याय मिळणार आहे ,या भूमिकेतून त्यांनी रिपब्लिकन पक्ष उभा करण्याचा प्रयत्न केला.मात्र बाबासाहेब आंबेडकरांचा मृत्यू झाल्याने हे कार्य अपूर्ण राहिले . बाबासाहेबांनी जे स्वप्न पाहिले ,ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी दादासाहेब गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन ऑक्टोबर 1957 मध्ये नागपूर येथे रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली .हा रिपब्लिकन पक्ष भारताच्या आणि महाराष्ट्राच्या गोरगरीब, दलित ,कष्टकरी समाजाच्या सुरक्षेचा पक्ष बनला हा पक्ष उभा करण्यात वाढविण्यात त्याचा विकास करण्यात दादासाहेब गायकवाड यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. परंतु रिपब्लिकन पक्षामध्ये गटबाजी वाढल्याने या पक्षाच्या वाढीला मर्यादा पडल्या .

दादासाहेब गायकवाडांनी 1964 साली काँग्रेस पक्षाबरोबर युती केली .त्या अगोदर 1937 ते 1964 अशी जवळपास तीस वर्षे काँग्रेस विरोधी तसेच काँग्रेस विरोधी असणाऱ्या राजकीय पक्ष संघटना यांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला .स्वातंत्र्याच्या चळवळीत काँग्रेसचा प्रभाव असल्यामुळे तसेच काँग्रेस ही तळागाळापर्यंत पोहोचली असल्यामुळे तिच्या विरोधात राजकारण करणे हे फार मोठे धाडसच होते.ते धाडस दादासाहेब गायकवाड आणि त्यांच्या पक्षाने केले .रिपब्लिकन पक्ष हा बौद्ध) पूर्वाश्रमीचे महार (समाजाचा असल्याचा प्रसार झाल्याने इतर समाज त्यापासून दूर राहिला .त्यामुळे पक्ष स्वतंत्र जरी असला ,त्यात काम करणारे इतर समाजाचे नेते जरी असले ,तरीही या पक्षाचा जनाधार वाढला नाही .1960 नंतर महाराष्ट्रात काँग्रेसचा जनाधार घटत चालला होता आणि काँग्रेसलासुद्धा दलित ओल्ड मॅनशी जुळवून घेण्यासाठी दादासाहेब गायकवाड ह्यांच्या गटाशी युती करावी लागली.

**दादासाहेब गायकवाड आणि इतर राजकीय पक्ष** : बाबासाहेब आंबेडकर यांनी 1920 ते 1956 या छत्तीस वर्षांच्या कालखंडात भारतात मोठी सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली .तिचा प्रारंभ महाराष्ट्रात झाला . तिचा मोठा जनाधार महाराष्ट्रात आहे .ती करत असताना बाबासाहेबांनी मोठी टीम उभी केली होती .त्यात दादासाहेब गायकवाड हे एक महत्त्वाचे नेते होते .बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व कोण करणार, हा अतिशय कळीचा मुद्दा बनला होता.त्यात बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी सविता तथा माईसाहेब आंबेडकर व मुलगा असावा ,असा एक प्रवाह होता; तर दुसरा प्रवाह बाबासाहेबांच्या समवेत काम करणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांनी या चळवळीचे आणि पक्षाचे नेतृत्व करावे ,असाही होता .बाबासाहेबांच्या मृत्युप्रकरणी संशयाचे वातावरण निर्माण झाल्याने माईसाहेब आंबेडकरांनी त्यानंतर सार्वजनिक जीवनापासून स्वतःला दूर ठेवले; तर यशवंत तथा भैय्यासाहेब आंबेडकर यांच्याकडे नेतृत्वाची क्षमता नसल्याने तेसुद्धा पुढे येऊ शकले नाहीत.अशावेळी रिपब्लिकन पक्षाच्या उभारणीत दादासाहेब गायकवाड यांनी सामूहिक नेतृत्वाचा स्वीकार केला, अर्थात सामूहिक नेतृत्व जरी असले तरी प्रबलता त्यात असते किंवा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा असणारे लोक अशा सामूहिक नेतृत्वाला दाद देत नाहीत ,त्यांचा संघर्ष सुरू असतो .त्यामुळे 1957 साली स्थापन झालेला रिपब्लिकन पक्ष हा जरी सामूहिक नेतृत्वाचा दावा करत असला तरीही या पक्षात प्रारंभापासून गट असलेले दिसतात .नेत्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा होत्या आणि त्यातूनच रिपब्लिकन पक्षाच्या अंतर्गत गायकवाड गट आणि कांबळे गट ,हे दोन गट सुरवातीला दिसू लागले.

संसदीय राजकारणामध्ये सर्वच राजकीय पक्षांमध्ये गट असतात .प्रत्येक गट हा आपल्या गटाला सत्तेच्या जागी आपल्या गटाची वर्णी लागावी यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतो ,तसा तो राजकारण करतो; पण काही राजकीय पक्षांमध्ये हे गट अदृश्य असतात किंवा या गटांच्या काम करण्याचं व्यापक परिणाम

त्यांच्या पक्षावर होणार नाही ,याची खबरदारी त्यांच्याकडून घेतली जाते. बाबासाहेबांच्या नंतर स्थापित झालेल्या रिपब्लिकन पक्षातील नेत्यांचे हे गटसुद्धा टोकदारपणे उभे राहिले .अंतर्गत गटबाजी असल्याने पक्षाचे संघटन होण्यास मर्यादा पडल्या आणि त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला सत्तेपासून दूर राहावे लागले .दुसऱ्या बाजूला काँग्रेस हा पक्ष स्वातंत्र्याच्या चळवळीत होता .जरी ब्राह्मणवादी आणि भांडवलवादी असं जरी त्याचं खरं स्वरूप असतं तरी त्याचा वरवरचा चेहरा हा सर्वसमावेशक होता .त्याचं खरं अंतरंग लोकांना दिसत नव्हते .त्यामुळे रिपब्लिकन पक्षात फूट कशी पडेल , याची तो सतत रणनीती आखताना दिसत होता .त्यामुळे काँग्रेस पक्ष उघडपणे रिपब्लिकन पक्षाच्या कटाला रसद पुरवत होता आणि त्यातून टू डिव्हाइड अँड रुल हे राजकारण तो करत होता .त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या वाढीला मोठ्या मर्यादा पडल्या .यावर खरं म्हणजे त्याकाळच्या नेतृत्वाने मात करायला हवी होती .ती त्यांनी केली असती तर महाराष्ट्राच्या राजकारणाचे स्वरूप त्यावेळी बदलण्यास पुरेसे ठरले असते .

फुटीचे हे राजकारण फक्त दादासाहेब गायकवाड यांच्यापुरतं मर्यादित न राहता ते पुढच्या टप्प्यातही तसेच कायम राहिले .त्यामुळे पुढच्या टप्प्यात गायकवाड गट, कांबळे गट, खोब्रागडे गट, गवई गट, आठवले गट, प्रकाश आंबेडकर गट , असे विविध प्रकारचे गट दलितांतर्गत उभे राहिले आणि त्यामुळे दलितांच्या शक्तीचा पात झाला .महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीचे साधारणतः पंधरा टक्के प्रमाणे आणि त्यात सगळ्यात जास्त पूर्वाश्रमीचा महार समाज आणि आत्ताचा बौद्ध समाज याचं प्रमाण मोठं आहे .साधारणतः हे प्रमाण सात ते नऊ टक्क्यांपर्यंत असू शकते .त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात बौद्ध समाज हा नेहमीच प्रभावशाली राहिला . निवडणूक वर्तनशास्त्राच्या अभ्यासानुसार ज्या राजकीय पक्षाला दहा टक्के मते असतात तो राजकीय पक्ष सत्तेच्या दिशेने जातो किंवा भविष्यात त्याला सत्ता मिळू शकते ,असे मानले जाते .महाराष्ट्रातील सर्व शोषित कष्टकरी समाज बाबासाहेबांच्या विचारांच्या नेतृत्वावर उभे राहू शकतात आणि ते भांडवलदार, जमीनदार, ब्राह्मण्यवादी यांना आव्हान निर्माण करू शकतात , ह्याची भीती नेहमीच प्रस्थापितांना वाटत असते.म्हणूनच ते आंबेडकरी चळवळींच्या विरोधात उभे राहिलेले दिसतात .कोणत्याही परिस्थितीत ही चळवळ व्यापक होणार नाही ,याची दक्षता घेतात तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण हे काँग्रेस पक्षाची धुरा सांभाळत होते .यशवंतराव चव्हाण हे मुरब्बी राजकारणी होते .त्यांनी बहुजन समाजाच्या नावाखाली मराठा समाजाचे संघटन केलं आणि राज्यात पंचायत राज व सहकार चळवळ यांची जोडणी करून काँग्रेस पक्ष व्यापक बनवला . त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात जाती वर्चस्व, जमिनीची मालकी असलेल्या जाती ह्या काँग्रेस पक्षाकडे राहिल्या ,तर मागासलेल्या जाती रिपब्लिकन पक्षाकडे आशेने पाहत होत्या ,तर मधल्या जाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या जातींसमोर राजकीय प्रवाहात सामील करणारा राजकीय पक्ष नसल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील हा पेच 1990 पर्यंत कायम राहिला .त्यामुळे महाराष्ट्रात विखुरलेला विरोधीपक्ष आणि संघटित असलेला काँग्रेस पक्ष ,असे चित्र 1960 ते 1990 पर्यंत पाहायला दिसते .यामध्ये 1978 मध्ये शरद पवार काँग्रेसमधून फुटून बाहेर पडले आणि त्यांनी स्वतंत्र स्वतःचा पक्ष काढला , यावेळी त्यांनी मराठा समाज आपल्याकडे आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला ,तर दुसऱ्या बाजूला काँग्रेसने मराठा बँक आपल्याकडे ठेवण्यासाठी शर्थीने प्रयत्न केले .या राजकीय गटात सत्तासंघर्ष असल्याने त्यांनी दलित जात समूहांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला .विशेषता बौद्धेतर समाजाला त्यांनी आरक्षित जागांवर उमेदवारी देऊन त्यांचं सिंबोलिक प्रतिनिधित्व दाखवण्याचा प्रयत्न केला ,तर दुसऱ्याबाजूला सत्तेच्या वळचणीला येणाऱ्या पण स्वाभिमान ठेवणाऱ्या रिपब्लिकन पक्षाची युती करून राजकारण करत राहिले .ही सगळी पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय आपल्याला दादासाहेब गायकवाड यांचं नेतृत्व समजून घेती येत नाही.

दादासाहेब गायकवाड यांच्या काळात प्रमुख विरोधी पक्ष हा साम्यवादी आणि समाजवादी पक्ष होता . बाबासाहेब आंबेडकर यांची साम्यवादी पक्षाबरोबर अशी स्पष्ट भूमिका यापूर्वी आपण पाहिली आहे ,तर ते

समाजवादी पक्षांना बरोबर घेऊन व्यापक असं विरोधकांचे राजकारण करू पाहत होते , त्याच पार्श्वभूमीवर त्यांनी राम मनोहर लोहिया , एस . एम . जोशी , ना . ग . गोरे या विरोधी पक्षांच्या नेत्यांना त्यांनी साद घालून रिपब्लिकन पक्ष बळकट करण्याचा प्रयत्न केला , तसे स्वप्न पाहिले; परंतु बाबासाहेब आंबेडकर हयात नसल्याने सर्व विरोधकांना एकत्र येऊन पुढे जाण्याचं त्यांचं राजकारण यशस्वी झाले नाही आणि नंतरच्या काळात समाजवाद्यांनी सुद्धा आंबेडकरवादी बरोबर आणि आंबेडकरवाद्यांनीसुद्धा समाजवाद्यांनी बरोबर घेतले नाही . याबाबत आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक ज .वि .पवार म्हणतात की , जर समाजवादी रिपब्लिकन पक्षात सहभागी झाले असते आंबेडकरी नेत्यांना रिपब्लिकन पक्षामध्ये महत्त्व प्राप्त झाले नसते ,संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात रिपब्लिकन पक्ष विरोधी पक्षाच्या आघाडीत होता म्हणूनच1957 च्या निवडणुकीत या आघाडीला मोठं यश मिळालं.[4]

आज आंबेडकरी चळवळतील नेत्यांचा ,तसेच दलितांचे राजकारण करणाऱ्या नेत्यांचा व्यापक अभ्यास झालेला दिसत नाही . तो जर नेतृत्व , न्याय चळवळ, संसदीय , बिगर संसदीय असा केला , तर महाराष्ट्रातील सामाजिक , राजकीय चळवळीच्या योगदानात त्यांनी काय भर टाकली आहे ,ते नव्या पिढीला समजण्यास मदत होईल . या पार्श्वभूमीवर हा छोटासा लेख आहे.

**संदर्भ-**

1. डांगळे अर्जुन ,बाबासाहेब आणि दादासाहेब) लेख(,कर्मवीर दादासाहेब गायकवाड - काळ आणि कर्तृत्व (ग्रंथ), महाराष्ट्र साहित्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, 2002. पृ. 18.

2. फडकुले) डॉ.) निर्मलकुमार (संपादक), कर्मवीर दादासाहेब गायकवाड - काळ आणि कर्तृत्व, महाराष्ट्र साहित्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती 2002. पृ. 81.

3. कसबे डॉ (.रावसाहेब ,मार्क्स आणि आंबेडकर , सुगावा प्रकाशन ,पुणे ,प्रथमावृत्ती1982 .

4. पवार ज .वि , .आबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ ,खंड पहिला , कौशल्य प्रकाशन ,औरंगाबाद ,दुसरी आवृत्ती , 2007 ,पृ .क्र .38.